INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 10 | NOVEMBER - 2021

# 'ठुमरीची चंद्रदेवता शोभा गुर्टू'

प्रा. नेत्रा मानकर
संशोधक
डॉ. एस. व्ही. कडू
मार्गदर्शक , श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.

**सारांश :-**



ठुमरी, दादरा,कजरी,होरी,चैती इत्यादी उपशास्त्रीय गीत प्रकार हे शोभाताईंची खासियत होते.आपल्या गायनात शास्त्रीय संगीतातील आलापी त्या खुबीने वापरत असत. शोभाताईंना खास आवडणारे गायन म्हणजे ठुमरी गायन म्हणजे त्या काळचे अख्तरी बाईचे गायन. त्यांचा आवाजही बेगम अख्तरांसारखाच जातिचा असल्याने त्यांनी बेगमअख्तराच्या ध्वनीमुद्रिकांचे वारंवार श्रवण करून त्यांची थोडीफार गायकी आत्मसात केली. बेगमचा सच्चा सूर आणि आवाजातील दर्द यामुळे गाण्यात मुर्की,अलंकार इत्यादी नसले तरी त्यांचे गाणे हृदयाला जाऊन भिडते. अख्तरी बाईकडे शिकणे त्यांना शक्य झाले नाही. तरी त्यांच्या आवडीमुळे अख्तरीबाईंच्या गाण्याचा प्रभाव त्यांच्यावर सर्वाधिक पडला.

**प्रस्तावना :-**

८ फेब्रुवारी 1924 साली कर्नाटक मधल्या बेळगाव या गावी शोभा गुर्टु यांचा जन्म झाला. त्यांचे आधीचे नाव 'भानुमती शिरोडकर'. लाडाने त्यांना घरी 'बेबी'म्हणत असत. भुर्जीखाँ साहेब त्यांना ' खुळी बेबी'म्हणत असत.शोभा गुर्टु यांची आई श्रीमती 'मेनकाबई शिरोडकर' या अदा करून ठुमरी गाणाऱ्या जाहीर कार्यक्रम करणाऱ्या कलावंतांपैकी त्या काळातील एकमेव. त्यांनी नृत्याचे शिक्षण बिकानेरचे 'शामसुंदर 'यांच्याकडे तर अदा करण्याचे खास शिक्षण बनारसचे " यांच्याकडे घेतले. शोभाताईंनी लहान वयातच नृत्याचे व अदा करून गाण्याचे कार्यक्रम त्यामुळे पाहिले होते. व त्याचे संस्कारही त्यांच्यावर झाले होते. शोभाताईंना अदा करणे शिकविण्यासाठी मेनकाबाईंनी मुद्दाम पन्नालाल यांना शोभाताईंचे गुरु म्हणून नियुक्त केले. पण डौलदार नृत्य करणे त्यांना साधले नाही. त्यांना संगीतातच अधिक रस वाटत असे . नथन खाँ साहेबांकडून शोभाताईंनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले.

शोभाताईंना खास आवडणारे गायन त्या काळाचे अख्तरीबाईंचे गायन. आवाजही अख्तरी बाईंसारख्याच जातीचा असल्याने त्यांनी बेगम अख्तरांच्या ध्वनीमुद्रिकांचे वारंवार पारायण करून त्यांची गायकी थोडीफार आत्मसात केली.बेगमचा सच्चा सूर आणि आवाजातील दर्द यामुळे गाण्यात मुर्क्या,अलंकार इत्यादी नसले तरी त्यांचे गाणे हृदयाला जाऊन भिडते .बेगम कडे शिकणे त्यांना शक्य झाले नाही. तरी सर्वात स्वाभाविक आवडीमुळे बेगमचा प्रभाव त्यांच्यावर सर्वाधिक पडला गाणं तपस्विनी अंजनी बाई मालपेकरांनी ही शोभाताईंना थोडेसे शिकवले पण इतर कोणाचीही खास तालीम त्यांना मिळाली नाही.

त्यानंतर शोभाताईंनी उस्ताद घम्मन खाँ साहेबांचा गंडाबंधन केले. घम्मन खाँ साहेब हे ग्वाल्हेर घराण्याचे एक उत्कृष्ट गायक होते. त्यांच्याकडे अनेक जिजांचा साठा होता.सावनी,कजरी,होरी, चैती, झुला, बिरहा,दादरा यांचा खजिना घम्मन खा साहेबांकडे होता. पूर्वी अंगात पंजाबी ढंग मिसळून ठुमरी बांधणं घम्मन खाँ साहेबांनी शोभा ताईंना शिकवलं. शोभाताई रियाजाला बसल्या की दणाणून गायच्या. खाँ साहेब म्हणायचे "अल्ला क्या गला पाया है बच्ची ने" खाँ साहेबांची तालीम कडक होती.सकाळी पाचला उठून कुल्ला करून खाँ साहेब आवाज तापवायला बसत.नंतर लगेच रियाज सुरू होत असे. मेनकाबाईंनी थोड्यावेळ उसंत घेतली की शोभाताई गायला तयार व्हायच्या.

शोभाताईंनी अनेक हिंदी आणि मराठी चित्रपटांसाठी गाणी गायलीत .1972 साली कमल अमरोहीच्या ' पाकिजा 'चित्रपटासाठी त्यांना पहिल्यांदा पार्श्वगायनाची संधी मिळाली.1973 साली ' फागुण ' चित्रपटात 'मोरे सय्या बेदर्दी बन गये ' ठुमरी गायली. 1978 साली प्रदर्शित झालेल्या 'मै तुलसी तेरे आंगन की' या चित्रपटातील 'सैया रुठ गये मैं मनाती रही' या दादऱ्यासाठी त्यांना सर्वोच्च महिला पार्श्वगायिका म्हणून त्यावर्षीच्या फिल्म फेअर मध्ये नामांकन करण्यात आले. हा दादरा शोभाताईंनी स्वतः रचला होता. हिंदी चित्रपटांबरोबरच शोभाताईंनी अनेक मराठी चित्रपटांसाठी देखील पार्श्वगायन केले आहे. त्यात 'कलावंतीन 'या चित्रपटातील 'पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा' ही बैठकीची लावणी शोभाताईंनी गायली. नुसते दादरा,ठुमरीच नव्हे तर लावणी सारखा शृंगार रसपूर्ण गीत प्रकार त्या तितक्याच ताकदीने गायच्या. ही लावणी त्याचे उत्तम उदाहरण आहे.

### कौटुंबिक माहिती :-

शोभाताई या प्रसिद्ध रजनर्तिका मेनकाबाई शिरोडकर यांच्या कन्या.संगीताचा वारसा शोभाताईंना त्यांच्या मातोश्रींकडूनच मिळाला होता. लहानपणापासून त्यांना संगीताचे शिक्षण मिळत गेले. परंतु लग्नानंतर देखील त्यांचे सांगितीक शिक्षण सुरूच राहिले. शोभाताईंचे लग्न धारवाडचे एक उच्च पोलीस अधिकारी आणि उत्तम सतारीये नारायण नाथ गुर्टू यांचे चिरंजीव विश्वनाथ गुर्टू यांच्याबरोबर झाला. गुर्टू परिवाराला देखील संगीताचा वारसा मिळाला होता. नारायण नाथ बाबूंचे वडील श्यामनाथ बाबू गुर्टू हे पट्टीचे सतारीये होते. नारायणनाथ बाबूंना त्यांच्या वडिलांकडूनच हा वारसा मिळाला होता. त्यांनी इमदात खा साहेबांकडे सतारीचे शिक्षण घेतले. तसेच विश्वनाथ बाबूंना देखील संगीताची खूप आवड होती. म्हणूनच लग्नानंतरही शोभाताईंना संगीताचा वारसा जपता आला. शोभाताईंना तीन मुले झाली त्यात सर्वात मोठे रवी हे लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या ऑर्केस्ट्रा मध्ये होते. तर मधले नरेंद्र गुर्टू हे वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळतात. तर सर्वात लहान चिरंजीव म्हणजे सुप्रसिद्ध ड्रमर त्रिलोक गुर्टू जे सध्या जर्मनीत वास्तव्याला आहेत.

**स्वभाव :-**

शोभाताईंचा स्वभाव खूप खेळकर होता. सिनेमा, सिनेमातली गाणी, नाच हे सर्व त्यांना खूप आवडायचे. रुचकर खाण्यापिण्याची आवड त्यांना होती. विनोद, हसीमजाक हे सगळे त्यांना आवडायचे. नकला करायलाही आवडायच्या. गुरु म्हणून कुठल्याही शिष्यांना त्यांचे दडपण आले नाही. हेच त्यांचे व्यक्तिमत्व कार्यक्रमांमधून दिसायचे. कलाकारांशी साथीदारांशी त्यांचे छान मित्रत्वाचे नाते होते. त्यांचे हे नाते श्रोत्यांशीही असायचे. श्रोत्यांशी केलेला तो सुखसंवाद असे. त्या जे गात त्याचा भाव त्या श्रोत्यांपर्यंत सहजपणे पोहोचवत.

**सौंदर्यात्मक दृष्टी :-**

शोभाताई ह्या पूरब, पंजाबी, ख्याली अंगाच्या अशा सर्व ठुमरी एकदम सहजपणे सादर करीत असत. पूरब आणि बनारस अंगामध्ये पंजाबी अंगाच्या मुर्क्यां,हरकती यांचे सौंदर्यपूर्ण मिश्रण करून त्या सादर करायच्या. शब्दांचे नजाकतीचे उच्चारण, नेटकेपणाने केलेली राग मिश्रणे, शब्दातील दर्द,पुकार आणि गायनातील एकूणच प्रगल्भता ही त्यांची गान वैशिष्ट्ये. त्यांच्या या अदाकारीमुळे प्रेक्षकांशी संवाद साधण्याची किमया त्यांच्याजवळ होती. शोभाताईंची आकर्षक मूर्ती, गातांनाचा नखरा, चेहऱ्यावरचा मिश्किल भाव,भुवयांच्या हालचाली, साथीदारांशी सुरू असलेला मुखसंवाद या सगळ्यांमुळे त्यांची ठुमरी जिवंत होत असे. गीतातील प्रत्येक शब्दांचे सौंदर्य आपल्या गायकीने व आपल्या हावभावांनी त्या उलगडून दाखवायच्या.

" रंगी सारी गुलाबी चुनरिया रे/ मोहे मारे नजरिया सावरिया रे / जाओ जी जाओ करो ना बतिया /ए जी बाली हैं मोरी उमरियारे/"

वयाच्या 70 व्या वर्षी देखील त्या " ए जी बाली हैं मोरी उमारियारे " हे म्हणताना मी वयाने बाली ( म्हणजे लहान नाही) नाही असे दाखवण्याचा अभिनय करायच्या परंतु त्यांच्या गाण्यातून त्या 'बाली उमर ' प्रभावीपणे व सुंदर दाखवायच्या.

**निष्कर्ष :-**

शोभाताईंनी ठुमरीच नव्हे तर उपशास्त्रीय संगीतातील इतरही गीत प्रकार जसे दादरा, गझल, नाट्यगीत, चैती,होरी, कजरी यासारख्या गीत प्रकारांनाही उत्तम प्रकारे आपल्या अभिनयातून आणि आपल्या गायनातून अतिशय प्रभावीपणे रसिकांच्या मनापर्यंत पोहोचविले आहे.

**संदर्भ :-**

१) शुभ्र काही जीव घेणे - अंबरीश मिश्र
२) सुरीले लोगो की संगत - गजेंद्र नारायण सिंह
३) मुंबई - आकाशवाणी संगीत पत्रिका मुक्ता भिडे यांनी घेतलेली मुलाखत.